# 'एचपीएल ग्रुप'चे मॉड्युलर स्विचेस निर्मिती क्षेत्रात पदार्पण

**पुणे :** भारतीय विद्युत क्षेत्रातील बडा समूह असलेल्या 'एचपीएल ग्रुप'ने विस्ताराचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला असून त्याअंतर्गत देशभर उपलब्ध असलेल्या आपल्या सध्याच्या उत्पादन श्रेणीत मॉड्युलर स्विचेस व खास सुट्या भागांची भर घातली आहे. यासंदर्भात पुणे दौऱ्यावर असलेले समूहाचे सह व्यवस्थापकीय संचालक गौतम सेठ म्हणाले, की 'एचपीएल'ने नेहमीच सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान सादर करुन ग्राहकांना संतुष्ट राखण्यावर भर दिला आहे. आम्ही सादर केलेली स्मार्ट मॉड्युलर स्विचेसची नवी श्रेणी ही याचेच पुढचे पाऊल आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन बनवलेले हे आकर्षक स्विच चोखंदळ ग्राहकांना नक्कीच पसंत पडावेत, अशीच त्यांची रचना करण्यात आली आहे. ग्राहकांना सर्वोत्तम उत्पादने देण्याची परंपरा कायम राखण्यासाठी 'एचपीएल'ने २ नवे उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी १२० कोटी रुपये गुंतवणूक केली आहे. हे प्रकल्प ४००००० चौरस फूट क्षेत्रात विस्तारलेले असून तेथे प्रगत विद्युत उपकरणे




बनवली जातील. यातील एक प्रकल्प केवळ स्विचगिअर्स, लायटिंग व ल्युमिनरीजसाठी राखीव असून दुसरा प्रकल्प हा इलेक्ट्रॉनिक एनर्जी मीटर विभागाचा विस्तार आहे. या व्यवसाय विस्तारातून पुढील ३ वर्षांत १५०० कोटी रुपये उलाढालीचा टप्पा गाठण्याचे समूहाचे ध्येय आहे.

'एचपीएल'चे शाखा प्रमुख अमित भंडारे म्हणाले, की पुणे विभागात एचपीएलने समाधानकारक प्रगती केली असून आता मॉड्युलर स्विचेस व सुट्या भागांच्या उत्पादनामुळे बाजारपेठेतील वाटा व स्थान अधिक भक्कम होण्याची अपेक्षा आहे. पुणे बाजारपेठेत आमचे १६०० रीटेलर्सची भक्कम वितरण यंत्रणा असून ग्राहकसेवेसाठी समर्पित जाळेही आहे. त्याखेरीज दर्जेदार उत्पादनांमुळे आम्हाला या विभागात स्वतंत्र ओळख प्राप्त झालेली आहे. त्याचाच फायदा येथील ग्राहकांना उत्तम सेवा देण्यात झाला आहे. सीएफएल व वायर्स या उत्पादनांतील आमची आघाडीच एचपीएल हा ब्रॅंड भक्कम बनवण्यात, तसेच 'एचपीएल'ला भारताची आघाडीची विद्युत कंपनी बनवण्यात उपयोगी पडत आहे. कंपनीच्या मॉड्युलर स्विचेस शाखेचे पश्चिम विभागीय विक्री व्यवस्थापक पुनित विन म्हणाले, की मॉड्युलर स्विचेस सादर केल्यानंतर आमचा बाजारपेठेतील हिस्सा व उलाढालही लक्षणीय वाढली आहे. या स्विचेसमध्ये सौंदर्यपूर्ण रचना व आधुनिक वैशिष्ट्यांचा संगम आहे. २१ रंगांत उपलब्ध असलेले हे स्विच व सॉकेट्स घरे, कार्यालये, दुकाने व हॉटेल्ससाठी 'एचपीएल'ला मॉड्युलर स्विचेसमधील प्राधान्याने पसंतीचा ब्रॅंड बनवण्यास सज्ज आहेत. मल्टी-प्लग आणि ७५० व्होल्ट डिझाईनचे हे स्विच रिमोट कंट्रोलने नियंत्रित करता येतात. हॉटेल्स व अन्य ठिकाणी वापरासाठी त्यात खास ३२ ॲम्प की टॅगही आहे.

समूहाचे उपाध्यक्ष ईश्वरदास यांनी याप्रसंगी 'एचपीएल ग्रुप'बाबत माहिती दिली. 'एचपीएल ग्रुप'ची स्थापना सन १९५६ मध्ये झाली. भारतीय विद्युत उद्योगातील ही आघाडीची कंपनी असून जागतिक दर्जाची व अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त उत्पादने बनवण्यात तिने आपली कटिबद्धता कायम राखली आहे. काळाच्या कसोटीवर गुणवत्ता सिद्ध केलेल्या, विश्वसनीय व खात्रीशीर उत्पादनांद्वारे हा समूह गेली ५६ वर्षे ग्राहकांना सेवा देत आहे. 'एचपीएल' उत्पादने तंत्रज्ञान, दर्जा व कार्यक्षमता यांत अव्वल असून लो-व्होल्टेज स्विचगिअर, संरक्षण उपकरणे, मीटरिंग, एनर्जी मॅनेजमेंट सिस्टिम, सीएफएल, ल्युमिनरीज, वायर्स व केबल्स आणि मॉड्युलर स्विचेस अशी उत्पादने स्पर्धकांहून सरस ठरली आहेत.